# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.

सामान्य प्रशासन विभाग

दूरध्वनी क्रमांक- ०२१७ -२७४०३००

जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-1/९०७ दि०४/07/2026, E- 90420

## -: जाहीर प्रसिध्दिकरण :-

**अर्ज स्विकारणे** :- दि.१५ ते १७ जूलै २०२६

**वेळ** :- सकाळी १०.०० ते सांय.५.०० वाजेपर्यंत

**अर्ज स्विकारण्याचे स्थळ** :- आस्थापना-४, सामान्य प्रशासन विभाग

**मुलाखतीचे ठिकाण व वेळः**- आयुक्त यांचे बैठक कक्ष, **दि.२१ /०७/२०२६** वेळ सकाळी ११:०० वाजता

सोलापूर महानगरपालिकेकडील खालील नमूद विविध संवर्गातील पदे विवक्षित कामकाजाकरिता तात्पुरत्या स्वरूपात भरणेकामी पदासमोर विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची नामिकासूची तयार करण्याकरिता त्यांचेकडून वर नमूद कालावधीमध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | अर्हता | मानधन |
|---|---|---|---|
| 1 | सहाय्यक अभियंता | अ) सोलापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान 3 वर्षाची नियमित सेवा पूर्ण | 56100/- |
| 2 | कनिष्ठ अभियंता | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण ,<br>ब) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्यास प्राधान्य<br>क) नेमणुकीनंतर ३ वर्षात कनिष्ठ व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | 38600/- |
| 3 | कनिष्ठ अभियंता सहाय्यक | अ) मान्यताप्राप्त अभियांत्रिकी शाखेची पदविका परीक्षा उत्तीर्ण ,<br>ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | 29200/- |
| 4 | वरिष्ठ मुख्यलेखनिक | आ)मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी<br>ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन 30 श.प्र.मि/इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मि परिक्षा उत्तीर्ण<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण किंवा शासनमान्य समकक्ष असलेली एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र,<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | 29200/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | वरिष्ठ श्रेणी लिपिक | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी<br>ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. / इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत मिळालेली MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली एक शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | 25500/- |
| 6. | कनिष्ठ श्रेणी लिपिक | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी<br>ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. / इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत मिळालेली MS-CIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली एक शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | 19900/- |

**अटी व शर्ती :-**

१) सदरची नियुक्ती सुचिबध्द कालमर्यादेपुरती असून त्यांचे मासिक परिश्रमिक/एकवट मानधन वर नमूद प्रमाणे राहिल.

२) ठराविक कालावधीकरीता नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

३) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी पूर्व सूचना न देता एकवट मानधनावरील नियुक्त अधिकारी /कर्मचारी यांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

४) ठराविक कालावधीकरीता नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

५) ठराविक कालावधीकरीता नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीरकरणे आवश्यक राहील.

६) अर्जदार यांनी अर्जासोबत संबंधित विभागातून ज्या पदावरुन सेवानिवृत्त झालेले आहेत त्या आदेशाची प्रत व विभागीय चौकशी/कारवाई प्रस्तावित नसल्याचा दाखला अर्जासोबत सोदर करणे आवश्यक राहिल.

७) ठराविक कालावधीकरीता नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती अथवा तदअनुषांगिक सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८) ठराविक कालावधीकरीता नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित

केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

९) सदरची सेवा ही सहा महिने पासून ते दोन वर्षाच्या मर्यादेकरीताच राहणार आहे. तथापी नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिका-यांच्या करार पदधतीमधील कामकाजाचे मुल्य मापन प्रति सहा महिने कालावधीनंतर करण्यात येईल.कामकाज उत्कृष्ठ असल्यावरच त्यांना पुढे मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

१०) सेवानिवृत्त अधिकारी यांची वयोमर्यादा 65 वर्षापेक्षा जास्त असू नये व कामकाज करणे शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असला पाहिजे.

११) सोलापूर महानगरपालिकेमधील कामकाजाचा अनुभव असल्यास वरील तक्त्यात नमूद अर्हता शिथिल करण्यात येईल.

(डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)
**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका.**